वाचले :- १) शासन, गृह विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. इएसटी-१४९६/२७/इएक्ससी-४, दि.३/९/१९९६
२) इकडील आदेश क्र.पसह/कावि/१९८८/२०१०, दि. १४/१२/२०१०
३) इकडील सुधारीत आदेश क्रं. सशा/पसह/कावि/२२८२/२०११ दि.१५/१२/२०११.
४) मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१४०४ दिनांक- २४/०८/२०१५.

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा,पसह संकलन
क्र.सशा/पसह/कावि/१७३१/२०१५
दि. १८/०९/२०१५

**विषय :- दारुचे अवैध उत्पादन, वाहतूक,विनियोग इ.बाबींचा सनियंत्रण व कार्यवाहीचे समन्वयन करण्यासाठी समिती**

**सुधारीत आदेश**

उक्त नमुद शासन निर्णयानुसार व आदेशानुसार सदर समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीतीलअशासकिय सदस्यांच्या नियुक्तीबाबत मा. पालकमंत्री पुणे जिल्हा यांचेकडून शिफारस प्राप्त झालेने सदरचे अशासकिय सदस्यांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणेत येत आहे.

| अ.क्र. | समितीची रचना व नावे | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | अध्यक्ष |
| २ | पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण | पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामिण, चव्हाणनगर, पाषाण, पुणे | सदस्य |
| ३ | दोन लोकप्रतिनिधी (यापैकी एक महिला प्रतिनिधी) | | |
| | १) श्री. राम मच्छिंद्र गावडे | मु. पो. टाकळेहाजी, ता. शिरुर, जि. पुणे. मो. नं. ९८८१७७७२६५ | सदस्य |
| | २) श्रीमती शोभा श्रीकांत पासलकर | मु.पो. शिरेवाडी, ता.भोर, जि. पुणे मो. नं. ९७६७८२३३१३ | सदस्य |
| ४ | देशी दारु संघटनेचा प्रतिनिधी श्री. अशोक विठ्ठल वणवे | मु. पो. मदनवाडी, भिगवण ता. इंदापूर, जि. पुणे मो.नं. ७८७५४७३१११ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे | राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, १४ A साधुवासवानी मार्ग, हॉटेल अमीर समोर, स्टेशन रोड, पुणे ४११ ००१ | सदस्य सचिव |

**(सौरभ रांव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :-

१) अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे तथा सदस्य सचिव,

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठीत करण्यात आलेले असून सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे.तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रति संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

२) स्वीय सहांय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस सविनय सादर.

सही/xx
**जिल्हाधिकारी पुणे करीता**

राज्य उत्पादन शुल्क

(18)

7/9

## जिल्हा समन्वय समिती

दारूचे अवैध उत्पादन, वाहतूक, विनियोग इत्यादी बाबींचे संनियंत्रण व कार्यवाहीचे समन्वयन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय, क्रमांक-एमएटी-१४९६/२७/[illegible]-४.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- ३ सप्टेंबर १९९६.

**प्रस्तावना :-**

दारूचे अवैध उत्पादन, वाहतूक, विनियोग इत्यादी बाबींचे अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचे परिणामकारक समन्वयन व संनियंत्रण करण्यासाठी अधिकारी व अशासकीय व्यक्ती यांचा समावेश असलेली एक समिती जिल्हा स्तरावर स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या व इतर अनुषंगिक बाबींचे परिणामकारक समन्वयन व संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समिती स्थापन करण्यात यावी. या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे राहतील :-

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
२) जिल्हा पोलीस अधीक्षक - सदस्य
३) दोन लोकप्रतिनिधी - सदस्य
[illegible]
४) दोन अशासकीय संघटनेचे प्रतिनिधी - सदस्य
५) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क - सदस्य-सचिव

या समितीवर सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या लोकप्रतिनिधींची नियुक्ती जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्याशी विचारविनिमय करून करावी.

उक्त जिल्हा समितीने दारूचे अवैध उत्पादन, वाहतूक, विनियोग इत्यादी आळा बसण्याच्या दृष्टीने उपाययोजनांचा विचार करावा. उपरोक्त बाबी सामाजिक सुरक्षेद्वारे दूर करण्याकरिता निश्चित करण्याचे दृष्टीने या समितीने विचारविनिमय व कार्यवाही करावी.

उक्त समितीच्या सभेस उपस्थित राहण्याकरिता अशासकीय सदस्यांना प्रवास किंवा दैनंदिन भत्ता इ. अनुज्ञेय राहणार नाही.

देणारे औपचारिक पत्र मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने पाठवावे. त्यात पत्रातील मजकुराची नोंद घेण्यात आली आहे, असे नमूद करण्यात यावे आणि आवश्यक तेथे ज्या कर्मचाऱ्याच्या प्रकरणाचा उल्लेख करण्यात आला आहे, त्याला त्याचे प्रकरण योग्य शासकीय मार्गाने पाठविण्यास (लोकप्रतिनिधींनी) कळवावे असेही नमूद करण्यात यावे. मंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्रांची त्यांच्या पातळीवरच उत्तरे देण्यात यावीत. अशा सर्व प्रकरणांत वरीलप्रमाणे औपचारिक उत्तर दिल्यानंतर मंत्री महोदयांनी आणखी सूचना दिल्या नसल्यास प्रकरण निकालात निघाल्याचे मानण्यात यावे.

**(५) विधानमंडळ / संसद सदस्यांकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांची नोंद घेणे :-**

विधानमंडळ / संसद सदस्यांकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांवर कार्यवाही करण्यासंबंधी यापूर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी देखील त्याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे या सूचना पुरेशा गांभीर्याने घेतल्या जात नाहीत असे आढळून येते. यापुढे अशा तक्रारी प्राप्त होणार नाहीत याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी. त्याकरिता प्रत्येक कार्यालय प्रमुख / मंत्रालयीन विभागातील प्रत्येक कार्यालयाने आपल्याकडे प्राप्त होणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या पत्रांसाठी खालील नमुन्यातील नोंदवही / संगणकीय नोंदी ठेवाव्यात.

| अ.क्र. | लोक-प्रतिनिधींचे नांव व पत्राचा दिनांक | विषय | पत्र कार्यासनात / कार्यालयात प्राप्त झाल्याचा दिनांक | पोच दिल्याचा दिनांक | अंतरिम / अंतिम उत्तर दिले असल्यास त्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**(६) विधानमंडळ / संसद सदस्यांकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांवर केलेल्या कार्यवाहीचा आढावा :-**

(i) मंत्रालयातील प्रत्येक प्रशासकीय विभागांनी, क्षेत्रीय विभागप्रमुखांनी तसेच जिल्हा / कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या विभागात / कार्यालयात प्राप्त झालेल्या विधानमंडळ / संसद सदस्यांच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा दर तीन महिन्यांनी न चुकता घ्यावा. (उदाहरणार्थ जानेवारी ते मार्च, एप्रिल ते जून, जुलै ते सप्टेंबर,ऑक्टोबर ते डिसेंबर यप्रमाणे).

(ii) अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालांचे मूल्यमापन करताना विधानमंडळ / संसद सदस्य यांच्या पत्रांवर कालमर्यादेत केलेली कार्यवाही ही बाब विचारात घेण्यात येईल.

**(७) सन्माननीय विधानमंडळ / संसद सदस्यांना माहिती पुरविणे :-**

(i) प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके यांच्या प्रती दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेता तसेच विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्यांना न चुकता पाठवाव्यात.

(ii) मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांचेकडे विधानमंडळ सदस्य यांनी त्यांची संसदीय कामकाजविषयक कर्तव्ये पार पाडण्यासाठी जनतेच्या कल्याणविषयक बाबींसंबंधीच्या माहितीची मागणी केल्यास, सदर माहिती त्यांना पुरविण्यात यावी.

(iii)राज्य शासनाच्या सर्व विभागांनी / कार्यालयांनी या सूचनांचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

उक्त समितीची बैठक महिन्यातून एकदा घ्यावी.

या जिल्हास्तरीय समन्वय व नियंत्रण समितीचा कार्यकाल ३ वर्षांचा राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ श. दा. भोपकर ]
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रतिलिपी सादर,
१] मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
२] मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
३] मा. मंत्री, राज्य उत्पादन शुल्क यांचे खाजगी सचिव.
४] सर्व जिल्हा पालकमंत्री यांचे खाजगी सचिव.
५] मा. राज्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, यांचे स्वीय सहाय्यक.

प्रतिलिपी,
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.
सर्व जिल्हा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.

श्री. मोरे
साहेब
~~020~~ ~~2~~
020 2612732
पुणे SP office